# प्रकरण सहावे

# उ प सं हा र

## प्रकरण सहावे

## उ प सं हा र

श्री. जी.डी. लाड यांचा जन्म एका सामान्य शेतकरी कुटुंबात झाला. बालपणापासूनच त्यांचे मन संवेदनाशील होते. सभोवताली समाजात घडणाऱ्या घटनांचा त्यांच्या बालमनावर परिणाम होत असे व ते त्याविषयी विचार-मंथन करीत. लहानपणीच ते काही दिवस राष्ट्रसेवादलामध्ये सामील झाले होते. पण नंतर त्यातून ते बाहेर पडले. विद्यार्थीदशेमध्ये त्यांनी कुंडल, येडेनिपाणी इत्यादी ठिकाणी ज्ञान ग्रहण केले व त्यानंतर पुढील शिक्षणासाठी ते पुण्याला गेले. विद्यार्थी असताना शिक्षकांनी त्यांच्यावर जे संस्कार केले त्यामुळे विधायक कार्य करण्याचा दृष्टिकोन निर्माण झाला. तसेच शाळेतील शिक्षक स्वातंत्र्याविषयी खूप माहिती सांगावयाचे आणि ते शिक्षक स्वत: खादी वापरायचे. इंग्रज हे परकीय आहेत ते आपल्यावर अन्याय करतात आर्थिक पिळवणूक करतात. त्यामुळे काहीही करून स्वातंत्र्य मिळाले पाहिजे, असे विचार त्यांच्या मनात यायचे. शिक्षणाने स्वकीय आणि परकीय याची समज आल्यानंतर कालांतराने त्यांनी १९४२ च्या स्वातंत्र्य चळवळीच्या होम-कुंडामध्ये स्वत:ला झोकून दिले.

१९४२ च्या या स्वातंत्र्यसंग्रामात दक्षिण सातारा विभागातील क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली ते इंग्रज विरोधी कारवाया करू लागले. चळवळीच्या या टप्प्यामध्ये श्री. जी.डी. लाड व त्यांच्या सहकाऱ्यांनी आंदोलने, मोर्चे व घातपाती कृत्ये यामध्ये भाग घेतला व ब्रिटिश प्रशासनाला हैरान करण्यास सुरुवात केली. सन १९४२ ते १९४३ पर्यंत तासगावचा मोर्चा, निमणी डाकबंगला जाळणे, कराडचा मोर्चा, इस्लामपूरचा मोर्चा, रेल्वे रूळ उध्वस्त, सावळजच्या औटपोस्टवर हल्ला, शेणोली स्टेशन जाळणे, तसेच

स्वसंरक्षणासाठी हत्यारांची चोरी करणे इत्यादीकारवायामध्ये इंग्रज सरकारशी असहकारितेचे तत्व अवलंबविले. त्यामुळे श्री. जी.डी. लाड यांचे स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासातील हे ऐतिहासिक कार्य मानता येईल. तसेच स्वातंत्र्य चळवळीच्या कालखंडातील त्यांची आणखी एक कामगिरी म्हणजे दरोडेखोरांना राष्ट्रीय कार्याकडे वळविण्यासाठी त्यांनी अथक प्रयत्न केले. या प्रयत्नामध्ये त्यांना अपेक्षित यश मिळू शकले नाही. जिवाची पर्वा न करता जवळजवळ एक महिनाभर दरोडेखोरांच्यामध्ये राहून त्यांना राष्ट्रीय कार्याकडे वळविण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

प्रतिसरकारची स्थापना एक जून, १९४३ रोजी कामेरी येथे करण्यात आली. प्रतिसरकारच्या स्थापनेनंतर श्री. जी.डी. लाड यांचे महत्वाचे योगदान म्हणजे त्यांनी तुफान सेनादलाची निर्मिती करण्यासाठी घेतलेले कष्ट होय. प्रतिसरकारची तुफान सेना निर्माण करण्यास श्री. जी.डी. लाड यांचा सिंहाचा वाटा होता. ते त्या तुफान सेनेचे फिल्डमार्शल होते. वैशिष्टयाची गोष्ट म्हणजे बालपणीच राष्ट्रसेवादलामध्ये असताना लाठी, काठी, भाला, बरची चालविण्याचे ज्ञान त्यांनी आत्मसात केले होते व नंतर बंदुका चालविण्याचे ज्ञान त्यांनी तुफान सेनादलातील सैनिकांना दिले. तुफान सेना म्हणजे प्रतिसरकारचा कणा होता. तुफान सेना दलातील जवानांना लष्करी शिक्षण देण्यासाठी कुंडल येथे युध्दशाळा निर्माण करण्यात आली व तेथे कवायतीचे लष्करी शिक्षण देऊन ब्रिटिश सरकार विरूध्द लढण्यास क्रांतिकारकांना सामर्थ्यवान बनविण्यात येत असे. जी.डी. लाडांनी तयार केलेल्या तुफान सेनेचा दरारा केवळ इंग्रज सरकारवरच होता असे नव्हे तर गावातील इंग्रजांचे खबरे, गुंड, जमीनदार, सावकार इत्यादी सामान्य जनतेला त्रास देणा-या मंडळीवरदेखील तुफान सेनेचा जबरदस्त धाक होता. गावक-यांना छळणा-या पिडणा-या गावगुंडांचा तुफान सेना बंदोबस्त करीत असे. तसेच शेणोली खिंडीत पगार गाडी लुटणे

(१९४३) धुळे खजिना लूट इत्यादी कारवायामध्ये श्री. जी.डी. लाड यांनी स्वत: सक्रिय सहभाग घेतला होता. अशा प्रकारे सैनिकांना केवळ प्रशिक्षण देण्याचेच काम ते करीत नसत तर तुफान सेनेमध्ये त्यांनी सेनापतीची भूमिका पार पाडली. प्रतिसरकारच्या एकूण कामगिरीमध्ये श्री. जी.डी. लाड यांचे योगदान मोठे होते. हे यावरून लक्षात येते. त्यांचा विवाह सोहळा देखील क्रांतिकारकाला शोभेल अशा पध्दतीने करण्यात आला. त्यामुळे हे व्यक्तिमत्त्व कसे धगधगते होमकुंड आहे याची जाणीव त्यांच्या सहकार्यांबरोबरच त्यांच्या पत्नीला देखील झाली. स्वातंत्र्य संग्रामातील त्यांचे कार्य १९४२ पासून १९४६ पर्यंत अव्याहतपणे चालू होते. १५ ऑगस्ट, १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले. स्वातंत्र्य मिळविण्याचा ध्यास त्यांनी व त्यांच्या सहकार्यांनी घेतला होता. स्वातंत्र्यप्राप्तीची स्वप्नपुर्ती आल्यानंतर जी.डी. लाड यांनी भारतातील सामाजिक प्रश्नाकडे लक्ष देण्यास सुरुवात केली.

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर काँग्रेसपक्षामध्ये राहून शेतकरी, शेत-मजुरांचे भले होणार नाही म्हणून त्यांनी शेतकरी कामगार पक्षाची स्थापना करण्यात पुढाकार घेतला. दरम्यान हैद्राबाद मुक्ती संग्रामाचा पेचप्रसंग निर्माण झाला. इ.स. १९४८ मध्ये भारताचे गृहमंत्री श्री. वल्लभभाई पटेल यांनी बहुतेक संस्थाने भारतात विलीन केली होती. पण हैद्राबादच्या निजामाने संस्थान भारतात विलीन करण्यास तयार नव्हते. त्या कालखंडात हैद्राबाद संस्थानातील रझाकारांनी हिंदू जनतेवर अन्विवित अत्याचार केले. तेथील हैद्राबाद मुक्ती संघटनेने तुफान सेनेची मदत मागितली. त्यांच्या हाकेला ओ देऊन श्री. जी.डी. लाड तुफान सेनेसह हैद्राबाद संस्थानात दाखल झाले व रझाकारांचा बंदोबस्त करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. दरम्यान भारत सरकारने हैद्राबाद संस्थानात सैन्य घुसविले व परिणामत: हैद्राबाद संस्थानाचे भारतात विलीणीकरण करण्यात आले. या मुक्ति संग्रामात देखील श्री.जी.डी. लाड व त्यांच्या तुफान सेनेने हिरीरीने भाग घेतलेला दिसून येतो.

सन १९४८ नंतरच्या कालखंडामध्ये श्री. जी.डी. लाड यांनी महाराष्ट्रातील सामान्य शेतक-यांच्या व सामान्य जनतेच्या विविध प्रश्नाकडे लक्ष घालण्याचा प्रयत्न केला. राजकीय संघर्षामध्ये भाग घेत असतानाच समाजात समानता आणावयाची असेल तर मुलांना शिक्षण दिले पाहिजे व शिक्षणाशिवाय पुरोगामी विचाराचा वर्ग निर्माण होणार नाही हे लक्षात घेऊन १९४८ साली श्री. जी.डी. लाड यांनी आपल्या काही सहका-यांच्या मदतीने नाना पाटील वसतिगृहाची स्थापना केली. या वसतिगृहातून अनेक विद्यार्थी आज समाजात जबाबदार व्यक्ती म्हणून कार्यरत आहेत.

स्वातंत्र्योत्तर कालखंडात काँग्रेस पक्षात राहून आपण उरी बाळगलेले स्वप्न साकार होत नाही असे लक्षात येताच त्यांनी व त्यांच्या सहका-यांनी ३ ऑगस्ट, १९४८ रोजी स्थापन केलेला शेतकरी कामगार पक्षाच्यावतीने शेतकरी, मजूर कामगारांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला. शेतक-यांच्या विकासाशिवाय समाज सुधारणार नाही ही त्यांची ठाम भूमिका होती. १९४८ साली शेतीमालाला योग्य भाव मिळावा म्हणून त्यांनी आंदोलन छेडले व दक्षिण सातारा जिल्ह्यात शेतक-यांचे मेळावे घेतले. दरम्यान रझाकार चळवळी वेळी हत्यारे गोळा केली म्हणून त्यांच्यावर कटाचा आरोप रचून त्यांना वाई व येरवडा जेलमध्ये ठेवण्यात आले. तुरुंगातील त्यांच्या वास्तव्यामध्ये त्यांनी मार्क्स लेनिन स्टॅलिन इत्यादी विचारवंतांच्या ग्रंथाचे वाचन केले. त्यामुळे त्यांच्यावर मार्क्सवादाचा व लेनिनवादाचा प्रभाव पडला व त्यांच्या पुढच्या कालखंडात देखील याच विचाराने प्रेरित होऊन त्यांनी शेतक-यासाठी व कष्टक-यांच्यासाठी सातत्याने प्रयत्न केल्याचे जाणवते. अडीच वर्षाच्या शिक्षेनंतर त्यांची तुरुंगातून मुक्तता झाली. इ.स. १९५० मध्ये दाभाडी येथे शेतकरी कामगार पक्षाच्या अधिवेशनात दाभाडी प्रबंध मांडण्यात आला. त्या प्रबंधानुसार अतिरिक्त जमीन जमीनदारांना सोडावी

लागणार होती. श्री. जी.डी. लाड यांनी अतिरिक्त जमिनदारांच्या कुळांना संघटित करण्याचा प्रयत्न केला. इ.स. १९५२ व १९५७ या दोन निवडणुकीत श्री. जी.डी. लाड शे.का. पक्षाचे उमेदवार म्हणून विधान-सभेच्या निवडणुकीस उभे राहीले. सन १९५२ च्या विधानसभेच्या निवडणुकीत ते पराभूत झाले व १९५७ मध्ये ते निवडून आले. सन १९५५ मध्ये गोवा मुक्ती संग्रामात त्यांचा सहभाग होता. तसेच संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये देखील त्यांनी सक्रीय भाग घेतला होता. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीने महाराष्ट्रात एक वादळ निर्माण केले होते. त्यामध्ये महाराष्ट्रातील सर्व लहान थोर नेत्यांनी आपआपल्या परीने भाग घेतला होता. संयुक्त महाराष्ट्राच्या या संघर्षात देखील जी.डी. लाड यांचे योगदान महत्वाचे होते. याशिवाय महाराष्ट्र-कर्नाटक प्रश्नाकडे देखील त्यांनी लक्ष दिले होते. सन १९५७ मध्ये विधानसभेवर निवडून आल्यानंतर त्यांनी कष्टकरी जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न केले. त्यांनी शेतक-यांचे व कष्टकरी जनतेचे प्रश्न विधानसभेत मांडले. एवढेच नव्हे तर शेतीमालाला योग्य भाव मिळावा म्हणून शेतकरी परिषदा व मेळावे आयोजित केले. १९६२ मध्ये श्री. जी.डी. लाड यांची विधान-परिषदेवर निवड आली. या सर्व कालखंडात शेतक-यांचे व कष्टक-यांचे प्रश्न सरकारपुढे मांडून धसास लावण्याचे त्यांनी प्रयत्न केले. त्यांच्या या भरीव कामगिरीमुळे १९६८ मध्ये शेतकरी किसान सभेचे अध्यक्ष करण्यात आले.

श्री. जी.डी. लाड यांनी केवळ शेतक-यांच्या प्रश्नाकडे लक्ष दिले नाही तर समाजाचा विकास करण्यासाठी १९७० मध्ये गांधी एज्युकेशन सोसा-यटीची स्थापना केली. आज या संस्थेची पाच हायस्कूल आहेत. केवळ परं-परागत शिक्षण न देता व्यावसायिक शिक्षण देणे गरजेचे आहे, म्हणून विविध व्यावसायिक कोर्सेस सुरू केले. १९७३ मध्ये "शिक्षण बचाव समिती" स्थापन करून कॅपिटेशन फी व शैक्षणिक भ्रष्टाचार विरोधी विद्यार्थ्यांत

जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला. व्यसनामुळे संसार उध्वस्त होतात त्यामुळे जी.डी. लाड यांनी कुंडल गाव व्यसनमुक्त करण्याचा प्रयत्न केला. याचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. श्री. जी.डी. लाड यांचे आणखी एक महत्वाचे कार्य म्हणजे अस्पृश्यता निवारण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न. स्वातंत्र्यपूर्व काळात त्यांनी सातारा परिसरात एक गाव एक पाणवठा तयार करण्याचा प्रयत्न केला व तसेच अनेक सहभोजनाचे कार्यक्रमही घडवून आणले.

अशाप्रकारे त्यांनी केलेल्या स्वातंत्र्य चळवळीतील महत्वपूर्ण अशा कामगिरीतून आणि समाज विधायक कार्यातून ते आज जनसामान्यांचे नेते म्हणून ओळखले जातात. एक धुरंदर क्रांतिकारक, तुफान सेनेचे अधिनायक, शेतकरी कामगार व मजुर यांचे मार्गदर्शक, स्वातंत्र्यानंतरही हैद्राबाद व गोवा मुक्ती संग्रामात धडाडीचे नेतृत्व करणारे, समाजजीवन गतिमान करणारे व त्यासाठी शिक्षणविषयक व्यापक दृष्टिकोन ठेवणारे, एक वैचारिक व्यक्तिमत्व तसेच सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक चळवळीतील महाराष्ट्रातील अनेक नामवंत विचारवंतात त्यांची गणपती केली जाते. असे ते एक वैचारिक पिंड असलेले व्यक्तिमत्व आहे. असे हे त्यांचे अष्टपैलू व्यक्तिमत्व त्यांच्या कार्यातून दिसून येते. त्यांच्या कामगिरीचे मूल्यमापन जर करावयाचे झाले तर स्वातंत्र्यपूर्व कालखंडातील म्हणजेच स्वातंत्र्य चळवळीतील त्यांचे योगदान अत्यंत महत्वाचे होते. व स्वातंत्र्योत्तर कालखंडातदेखील त्यांनी शेतकरी कष्टकरी जनतेसाठी अविरतपणे केलेले कार्य तितक्याच मोलाचे आहे.

.......

## संदर्भग्रंथ सूची

### (१) प्राथमिक साधने


१) लाड जी.डी., " पेटलेले पारतंत्र्य व धुमसते स्वातंत्र्य ", प्रकाशन भारती विद्यापीठ, पुणे, १९८६.

२) डॉ. पाटील उत्तमराव / श्री. आप्पासाहेब लाड, " क्रांतिवीर देशभक्त नाना पाटील", उषा प्रकाशन, औंध, प्रथमावृत्ती, फेब्रुवारी, १९४७.

३) टिल्लू पांडूरंग श्रीधर, "सातारचा सिंह - क्रांतिसिंह नाना पाटील यांचे चरित्र व पोवाडे", दुसरी आवृत्ती, १९४६.

४) डॉ. पाटील उत्तमराव, "क्रांतिपर्व", प्रकाशक - डॉ. हेमंत देशमुख, धुळे, द्वितीयावृत्ती, १९८७.

५) पाटील व्ही.वाय्., "आम्ही अनुभवलेले क्रांतिअग्रणी जी.डी. लाड, कुंडल", १९८३.

६) पाटील व्ही.वाय्., "जी.डी. उर्फ बापूसाहेब लाड (कुंडल) यांचे शैक्षणिक विचार", १९८३.

७) लाड जी.डी., "नाना पाटील इतिहासातील एक स्फुल्लिंग", (लेख) पवार जयसिंगराव, (संपा.) क्रांतिसिंह नाना पाटील, अरुंधती प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, १९८३.

८) लाड जी.डी., "तांबटकाका आणि ४२ ची चळवळ", (लेख) प्रा.पाटील दिनकर / प्रा. पवार जे.के., दलितमित्र तांबटकाका स्मृतिग्रंथ, राज प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, १९८६.

९) लाड जी.डी., "माजी आमदार गोविंदराव कलिकते - खळखळ वाहणारा निर्झर", लेख, प्रा.पाटील दिनकर / प्रा. भाटले विष्णूपंत, गोविंद-गौरव, कीर्ती प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, १९९४.

१०) लाड जी.डी., "शासनकर्त्यांना प्राणोप्रश्नाचे गांभीर्य नाही", दैनिक सकाळ, नऊ ऑगस्ट, १९८८.

## (२) दैनिके

१) धों.म. मोहिते, "बापूंची शिदोरी", दैनिक सकाळ, जानेवारी, १९८३.

२) प्रा. स.ग. कापसे, "क्रांतिसिंह नाना पाटील यांचे व्यक्तिमत्व व कार्य," दैनिक पुढारी, १४ डिसेंबर, १९८०.

३) पारेकर, दशरथ, "प्रतिसरकारची कहानी;" "दैनिक सकाळ, कोल्हापूर, ऑक्टोबर, १९८१.

४) व्ही. वाय. पाटील, "क्रांतिअग्रणी श्री. जी.डी. उर्फ बापूसाहेब लाड", दैनिक केसरी, ४ जानेवारी, १९८२.

५) वि.का. चौधरी, सचिव, महाराष्ट्र राज्य गॅझोटियर, "स्वातंत्र्यासाठी शेवटची झुंज," बेचाळीसचे आंदोलन, दैनिक पुढारी, ९ ऑगस्ट, १९८२.

६) रा.तु. पाटील, "सातारा क्रांती सूत्रधार जी.डी. बापू", दैनिक सकाळ, १० जानेवारी, १९८३.

७) डॉ. शिंदे आबासाहेब, "प्रतिसरकारची न्यायव्यवस्था", दैनिक तरुण भारत, दि. १८.८.१९८५.

८) डॉ. शिंदे आबासाहेब, "यशवंतराव चव्हाण आणि साताराचे प्रतिसरकार", दैनिक महाराष्ट्र टाइम्स, ११ मार्च, १९८८.

९) अनुताई लिमये, "स्वातंत्र्य लढयातील महिलांचा सहभाग", दैनिक सकाळ, १५ ऑगस्ट, १९९१.

१०) दैनिक सकाळ अग्रलेख, "क्रांतिपर्वाचे स्मरण", ८ ऑगस्ट, १९९२.

## (३) साप्ताहिके

१) सावंत शामराव, "बापूसाहेब, एक झंझावती व्यक्तिमत्व", साप्ताहिक आपले जग, १० जानेवारी, १९८३.

२) श्री. राम मास्तर, "माझे मनोगत", साप्ताहिक आपले जग, ८ सप्टेंबर, १९८६.

३) मराठी साप्ताहिक, "क्रांतिसिंह", ६ नोव्हेंबर, १९८३.

४) साप्ताहिक, आपले जग, ८ सप्टेंबर, १९८६.

५) वीर आर.एम्., बापूसाहेब लाड, यांचे क्रांतिमय जीवन, साप्ताहिक रामप्रताप, ९ जानेवारी, १९८३.

६) साप्ताहिक, आपले जग, २ सप्टेंबर, १९९१.

## (४) मुलाखती

१) लाड, जी.डी.

२) आज्ञा पवार, कुंडल

३) रामचंद्र लाड, कुंडल

४) गोविंद पवार, कुंडल

५) आप्पा लाड, कुंडल

६) आनंद कुंभार, कुंडल
७) निवृत्ती कुंभार, कुंडल
८) विठ्ठल पुजारी, कुंडल
९) शामराव लाड, कुंडल
१०) बाबुराव सुतार, कुंडल
११) डॉ. प्रकाश कुंभार, कोल्हापूर.

(५) दुय्यम साधने

संदर्भ ग्रंथ


१) आचार्य अत्रे प्र.के., "क-हेचे पाणी", खंड तिसरा.

२) अंदूरकर व्यं.गो., "चणे खावे लोखंडाचे", प्रकाशक - लोकसेवा सहकारी मुद्रणालय, प्रथमावृत्ती, १९८५.

३) कीर, धनंजय, महात्मा जोतिराव फुले, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९९०.

४) केळकर श्रीपाद, "छोडो भारत १९४२", कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे-३०, प्रथमावृत्ती, १९८३.

५) कारेकर म.सू., "क्रांतिसिंह नाना पाटील", प्रकाशक वि.ना. नवलकर, पुणे, प्रथमावृत्ती, १९७७.

६) कुलकर्णी राजाभाऊ / केळकर श्रीपाद, "जळते दिवस पेटलेली माणसे" प्रकाशक सदाशिव बागाईतकर, पुणे, चौथी आवृत्ती, १९८६.

७) केतकर कुमार, "कथा स्वातंत्र्याची", प्रकाशक महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती, मुंबई, प्रथमावृत्ती, १९८५.

८) गरूड शांताराम, "क्रांतिकारी कफल्लक", प्रकाशक मागोवा, पुणे, प्रथमावृत्ती, १९८१.

९) गरूड शांताराम, "१९४२ चा लोकलढा आणि साता-याचे प्रतिसरकार", प्रबोधन प्रकाशन, इचलकरंजी, १९९१.

१०) चव्हाण यशवंतराव, "कृष्णाकाठ", प्रेस्टिज प्रकाशन, पुणे.

११) चव्हाण प्र.ग. "दादा -एक कार्यकर्ते", प्रकाशिका; सौ. कृष्णा चव्हाण, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, १९९४.

१२) जाधव, अंकुश (संपा.) "सोनहिरा", सोनहिरा प्रकाशन, मुंबई, जून, १९८८.

१३) जोशी, एस्.एम्., "मी अेस्.एम्." (आत्मकथा), कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९९४.

१४) जावडेकर, श.द., "आधुनिक भारत", प्रकाशक; सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला, पुणे-२, एक ऑगस्ट, १९५३.

१५) टाकसाळ मनोहर / नाईकवडे (संपा), "बिंदुसरचे पाणी", डॉ. काशिनाथराव जाधव, गौरव समिती प्रकाशन, बीड, १९८३.

१६) ठोके, मो.नि., "श्रमिकांचा कैवारी", पारख प्रकाशन, बेळगाव, प्रथमावृत्ती, १९८३.

१७) डॉ. देशमुख हेमंत (संपा.) पक्षी पिंज-यातून उडाला, प्रकाशक सौ. लिलाताई पाटील, शिरपूर, जि. धुळे, प्रथमावृत्ती, १९९१.

१८) देशपांडे बा.प., "बेळगाव जिल्हयातील स्वातंत्र्य संग्राम" प्रकाशक बेळगाव जिल्हा खादी ग्रामोद्योग संघ, प्रथम आवृत्ती, ऑगस्ट, १९७८.

१९) धर्माधिकारी भालचंद्र, "महाराष्ट्राचा महापुरुष - वसंतदादा", विश्वकर्मा प्रकाशन, सातारा, प्रथमावृत्ती, १९८६.

२०) नगरकर वसंत, "भारतीय स्वातंत्र्य संग्राम", प्रेस्टीज प्रकाशन, पुणे, २६ जानेवारी, १९८१.

२१) प्रा. पाटील विलास, "क्रांतिसिंह नाना पाटील", प्रथमावृत्ती, जानेवारी, १९८६.

२२) पाटील रामचंद्र तुकाराम, "सांगली साता-याचे राजकारण", परखड,प्रकाशन, तडसर, प्रथमावृत्ती, १९८६.

२३) पाटील विश्वास, "क्रांतिसूर्य", सन्मित्र प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, १९८४.

२४) पाटील रामचंद्र तुकाराम, "क्रांतिसिंह नाना पाटील, जिवितकार्य आणि तत्वज्ञान", परखड प्रकाशन, तडसर, दुसरीआवृत्ती, १९८६.

२५) पाटील रामचंद्र तुकाराम, "स्वातंत्र्य सेनानी श्री. स्वामी रामानंद भारती", परखड प्रकाशन, तडसर, प्रथमावृत्ती, १९८६.

२६) प्रा. पाटील, दिनकर / प्रा. भाटले विष्णुपंत, "गोविंद गौरव, श्री. गोविंदराव कलिकते यांचा गौरव ग्रंथ", किर्ती प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, १९९४.

२७) प्रा. पाटील दिनकर / प्रा. पवार जे.के., "दलितमित्र तांबटकाका", राज प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, १९८६.

२८) पाटील, रा.तु., "यशवंतराव चव्हाण - एक कर्तबगार पण वादग्रस्त मुत्सद्दी", जनवाणी प्रकाशन, दुसरी आवृत्ती, १४ जानेवारी,१९८७.

२९) पंडित गौतम, "स्वातंत्र्य यज्ञातील समिधा", विद्यानंद प्रकाशन, कुर्ला, प्रथमावृत्ती, १९८४.

३०) प्रा. डॉ. पवार जयसिंगराव (संपा.), "क्रांतिसिंह नाना पाटील" खंड एक व दोन कोल्हापूर, प्रथमावृत्ती, १९८३.

३१) पोतदार वसंत, "हैद्राबाद स्वातंत्र्य संग्राम", द्वितीय आवृत्ती, १९८४.

३२) प्रधान ग.प्र., "स्वातंत्र्य संग्रामाचे महाभारत", साधना प्रकाशन, पुणे.

३३) फडके, य.दि., "केशवराव जेधे", श्रीविद्या प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९८२.

३४) फडणीस जगन, "शेतकरी कामगार पक्षाचे राजकारण", प्रकाशक - अजब पुस्तकालय, कोल्हापूर ८ फेब्रुवारी, १९७८.

३५) श्री. बिवलकर रा., "नाना पाटील चरित्र", प्रकाशक - देशमुख रा.ज., पुणे-२.

३६) बागल माधवराव, "बहुजन समाजाचे शिल्पकार".

३७) बेडेकर दि.के., "संयुक्त महाराष्ट्र चित्रशाळा", पुणे, १९४७.

३८) भालेराव अनंत, "पेटलेले दिवस", श्रीविद्या प्रकाशन,पुणे, प्रथमावृत्ती, १९८५.

३९) मगदूम रावसाहेब, "कोल्हापूर जिल्हा स्वातंत्र्यलढा", सुवर्ण महोत्सवी ग्रंथ, १९९१.

४०) माडगूळकर ग.दि., "मंतरलेले दिवस", साधना प्रकाशन, पुणे, पाचवी आवृत्ती, १९८१.

४१) माडगूळकर ग. दि., "तीळ आणि तांदुळ", विश्वमोहिनी प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती, १९८९.

४२) मंगळवेढेकर राजा, "अखेरची झुंज", १९४२ च्या भारतीय स्वातंत्र्य-लढयाचा इतिहास, प्रकाशक अरुण पारगावकर, पुणे, प्रथमावृत्ती, १९९२.

४३) मगुंडकर, मा.प., "महात्मा फुले आणि सत्यशोधक चळवळ", सोशल बुक स्टॉल, पुणे, पहिली आवृत्ती, १९५४.

४४) प्रा. माने, डि.ए., "व्यर्थ न हो बलिदान", नयन प्रकाशन, सांगली, द्वितीयावृत्ती, १९८८.

४५) लोहार दत्तात्रय बळवंत, "स्वातंत्र्याचा संग्राम १९३० ते १९४२", प्रकाशक बिळाशी, प्रथमावृत्ती, १९८२.

४६) लिमये शिरभाऊ, "निवडुंगाची बोंडे", सह्याद्री प्रकाशन, प्रथमावृत्ती, १९६२.

४७) डॉ. वैद्य सुमन / डॉ. कोठेकर शांता, "महाराष्ट्रातील कॉंग्रेसचा स्वातंत्र्यलढा", प्रकाशक – महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९८५.

४८) डॉ. शिंदे आबासाहेब, "साताराचे प्रतिसरकार : प्रसंग आणि व्यक्ति", उषा प्रकाशन, १९८७, कोल्हापूर.

४९) शिवणीकर राघव, "साताराचा सिंह नाना पाटील चरित्र", प्रकाशक – श्रीराम बुक एजन्सी, पुणे, प्रथमावृत्ती, १९८६.

५०) शिवणीकर राघव, "जय क्रांतिसिंह", प्रकाशक – सौ. सोनाबाई चव्हाण, प्रथमावृत्ती, १९७८.

५१) शेटये चंद्रकांत, "स्वामी रामानंद भारती", भारती प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, १९६१.

५२) सनदे, सा.बा., "जीवन संग्राम", प्रकाशक - महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती, मंडळ, मंत्रालय, मुंबई, १९८३.

५३) सगरे अजित, "जिद्दी झुंझार", प्रकाशन श्रीविद्या पुणे, प्रथमावृत्ती १९८४.

५४) सावंत शिवाजी / शिवणीकर राघव, "क्रांतिसिंहाची गावरान बोली", अनुबंध प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, १९८२.

५५) ~~सोमन रा.म.~~ ठोकळे [illegible], "जागृत सातारा".

## (६) इंग्रजी ग्रंथ

1) Gupta D.C., "Indian National Movement and Constitutional Development", Vikas Publishing house, New Delhi, Fourth Revised Edition, 1983.

2) Grover B.L., "Modern Indian History", Schand and Company, New Delhi, 1990.

3) Mahajan V.D., "Modern Indian History, S.chand and company, New Delhi, 1983.

4) Mookherji S.B., "Current Sociology Nationalism Vol XXI", International Sociological Association Printed in Netherlands, 1973.

5) Shinde A.B., "Parallel Government of Satara - a Phase of the Quit India Movement", New Delhi, 1990.

## (७) विशेषांक व स्मरणिका


१) क्रांतिअग्रणी जी.डी. लाड, स्मरणिका, कुंडल, जि. सांगली, १९८३.
२) शेठ पुरुषोत्तम (संपा.) शेखकाका गौरव स्मरणिका, सातारा, १९८५.
३) पुरोगामी विद्यार्थी युवक संघटना, "क्रांतिसिंह स्मरणिका", विटा, १९७८.
४) तांबटकाका गौरव अंक, कुंडल, १९८२.
५) क्रांतिसिंह नाना पाटील विशेषांक, फलटण, पुतळा समिती, फलटण, १९८१.
६) चव्हाण अण्णा (संपा.) "प्रहार", कोल्हापूर स्वातंत्र्य सैनिक, खास अंक, १९८२.


## (८) टिपणी


१) भारतीय शेतकरी कामगार पक्ष, अधिवेशन १३ वे, तुळजापूर, दि. ११३, १४ व १४ मे, १९८८ राजकीय ठरावाचा मसूदा, प्रकाशक - दि.बा. पाटील, सरचिटणीस अलिबाग रायगड.

२) लाड जी.डी., अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य शेतकरी सभा अभ्यास शिबिर, धुळे, दि. २८-२९ व ३० सप्टेंबर, १९७९, टिपणी.


## (९) प्रकाशित न झालेले एम्.फिल्./ पीएच्.डी. शोधप्रबंध

शिवाजी विद्यापीठास सादर केलेले -


१) प्रा. भोसले अरुण, "History of Freedom Movement in Satara District (From 1885 to 1947).

२) नलवडे द.ब., "सातान्याच्या प्रतिसरकारमधील स्त्रियांचा सहभाग", १९८८.


.....

# परिशिष्ट क्र. १

## मान. जी.डी. उर्फ बापूसाहेब लाड यांना श्रमजीवी व कष्टकरी जनतेतर्फे सादर "मानपत्र"

क्रांतिअग्रणी भाई बापूसाहेब !

आजच्या तळपत्या सूर्याला साक्ष ठेऊन, तुमच्यावर अमाप श्रध्दा ठेवणारी-अपार प्रेम करणारी आणि तुमच्या शौर्यगाथेला हजारवेळा लवून मुजरा करणारी श्रमजीवी आणि कष्टकरी जनता उत्स्फूर्त मनाने तुम्हाला मानपत्र अर्पण करीत आहे !

धगधगते वीर नेते माननीय जी.डी. बापू !

स्वातंत्र्य लढयातील सातारा क्रांतीचे आपण पंचप्राण ठरलेले अहात, ब्रिटिश सरकार धार्जिण्या तकलादू पुढा-यांना आणि गावगुंडाना प्रतिसरकारचा पायबंद घालण्यात आणि ग्रामराज्य साकार करुन स्वतंत्र न्यायसंस्थेमार्फत न्यायदान घडविण्यात आपण अग्रेसर होतात.

तुफान सेनेचे शूर सरसेनापती भाई बापूसाहेब !

तरुणांच्या धमण्यातून वाहणा-या रक्ताला उगवत्या आरक्त सूर्याचे तेज तुम्ही दिले ! म्हणूनच स्वातंत्र्याचा सूर्य या भारतावर उगवला आणि ज्यांच्या साम्राज्यावरचा सूर्य कधीच मावळत नव्हता ते साम्राज्यच मावळले ! माननीय भाई बापूसाहेब, तुमच्या समग्र जीवनातून आम्हा श्रमजीवी-कष्टकरी जनतेला हाच संदेश लाभला आहे की, साम्राज्ये ही नष्ट होण्यासाठीच असतात. आणि श्रमजीवी आणि कष्टक-यांच्या अंत:करणात क्रांतीची ज्योत सदैव पेटलेलीच असते !

गरिबांच्या ह्दयावर विराजमान झालेले भाई बापू ।

तुमचे राजकीय क्षेत्रातील पाऊल खंबीर रोवलेले आहे. आपण शेतकरी कामगारी पक्षाचे अध्वर्यू आहात. आपण आपल्या नि:स्पृह वाणीने महाराष्ट्राची विधान सभा आणि विधान परिषद गाजविलेली आहे. मार्क्सवादाचा तेजस्वी ठेवा ख-या अर्थाने तुमच्याजवळ आहे. माननीय भाई तुमच्या अनमोल गुणांचा आम्हा सामान्य कष्टक-यांना, मजुरांना, शेतक-यांना अभिमान वाटतो ।

स्वातंत्र्यवीरांचे स्फूर्तिस्थान मा. भाई जी.डी. लाड ।

स्वातंत्र्य लढयात कुंडल ग्रुपने तुमच्या नेतृत्वाखाली जे अद्वितीय शौर्य गाजविले त्याने कुंडल हे गांव स्वातंत्र्य देवतेच्या कानातील अक्षरश: कुंडल ठरले. क्रांतिसिंहाच्या पवित्र्याने पाऊले उचलून स्वातंत्र्य लढयातला सिंहाचा वाटा तुम्ही उचललात. रझाकारांना आणि पोर्तुगिजांना नमविण्यासाठी तुम्ही सिंह झेप घेतलीत । खडतर आयुष्य आणि तुरुंगवास भोगून स्वातंत्र्य लक्ष्मीच्या गळयातील तुम्ही एक मौल्यवान देणं ठरतात । जिथे जिथे क्रांतीचे स्फुल्लिंग आहे तिथे तिथे तुमची स्फूर्ति ते स्फुल्लिंग प्रज्वलित करीत आहे - करीत राहील यावर आमचा अढळ विश्वास आहे ।

आमच्या नसनसात वीज पेरणारे भाई -

जी.डी. बापू । तुमच्या कष्टातून आलेले या स्वातंत्र्यातही अजून आम्ही गुलाम आहोत- अजून आम्ही दु:खी आहोत । गरिबीच्या रणरणत्या वाळवंटावर, भांडवलशाहीचे आणि सरंजामशाहीचे तीव्र चटके अद्यापहि आम्हाला होरपळून काढीत आहेत. पण वयाची साठी उलटली तरी कधीही

नाउमेद न झालेले तुमचे अंत:करण तुमच्या डोळ्यातून आम्हाला हाक देत आहे । आम्हा गरिबाविषयी अपार करुणा बाळगणारी तुमची नजर आमच्या नसनसातून वीज पेरीत जात आहे. आम्ही गरीब आहोत आणि तुम्ही गरिबांचे नेते आहात हे आपले अभंग नाते आहे. या ख-या नात्याच्या उमाळ्याने आमच्या काळजातून स्फुरण पावलेले हे मानपत्र, कधीहि मलीन न झालेल्या आपल्या पवित्र चरणावर अर्पण करीत आहोत । गरिबांच्या भावना ओळखून आपण या मानपत्राचा सप्रेम स्वीकार करुन आम्हाला उपकृत करावे अशी नम्र प्रार्थना आहे.

इन्क्लाब झिंदाबाद । प्रतीसरकार झिंदाबाद ।
तुफान सेना झिंदाबाद । जी.डी. बापू झिंदाबाद ।

......